# भूदान चळवळ : स्वातंत्र्योत्तर समाजक्रांतीकारक चळवळ

**प्रा. पाटील प्रमोद जगन्नाथ**, राज्यशास्त्र विभाग माऊली महाविद्यालय,वडाळा, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर.

मो.नं. ९५५२५२९३३७ Email ID : pramod24patil@gmail.com

---

**प्रस्तावना :**

जगभरातील सर्वच देशांना जमिनीच्या प्रश्नाला कमी अधिक प्रमाणात तोंड दयावे लागले आहे. प्राचीनकाळी जमिन मुबलक आणि माणसे कमी अशी परिस्थितीती होती. १९ व्या शतकात औद्योगिक क्रांती घडून आली जमिनीची मागणी व किंमत वाढतच गेली.माणसाच्या आर्थिक दर्जा त्याच्या जमिनीच्या मालकीवरून ओळखला जाऊ लागला त्यामुळे जमिनीच्या प्रश्नावरून संघर्ष वाढू लागला.

भारतात मात्र स्वातंत्र्योत्तर कालखंडात गांधी विचारांनी प्रभावीत अहिंसक मार्गाने लाखो एकर जमिनीचे हस्तांतर करणारी भूदान चळवळ विनोबांच्या मार्गदर्शनाखाली घडली. भूदान आंदोलन हे भारताच्या इतिहासातील सुवर्ण अक्षरांनी लिहून ठेवण्यासारखे हे आंदोलन आहे. नैतीकतेच्या आधारावर जमीन मागणे आणि ती भूमिहीन मजुरांना वाटणे ती ही एवढ्या व्यापक प्रमाणात ही अशक्य प्रायः कल्पना सत्यात उतरवण्याचे काम विनोबांनी केले तेही गैरसरकारी मार्गाने करण्याचे कार्य विनोबांनी केली.

सदर संशोधन पेपरमध्ये विनोबा प्रेरित भूदान आंदोलनाचा भारताच्या वैचारिक सामाजिक, राजकीय प्रक्रियेवर केलेल्या परिणामाचा अभ्यास करण्यात आला आहे.

**गृहितके :**

१) सर्वोदय विचारांची पार्श्वभूमी भूदान चळवळीला लाभली व भूदान चळवळीव्दारे सर्वोदय विचाराचा प्रसार विनोबांनी केला.

२) विनोबांचे भूदान आंदोलन सर्व राजकीय पक्ष, शासन संस्था यांच्यापासून अलिप्त होते. विशेषतः काँग्रेसपक्षाच्या प्रभावापासून ते मुक्त होते.

३) शेतीचे विकेंद्रीकरण भूदान चळवळीद्वारे मोठ्या प्रमाणात झाले.

४) विनोबांनी भूदान चळवळीद्वारे गांधींच्या विश्वस्त संकल्पनेचा विस्तार केला.

५) भूदान चळवळ न्याय, समता संकल्पनाची प्रतिष्ठापना करण्यात यशस्वी ठरली.

**उद्दिष्ट्ये :-**

१) विनोबांनी भूदान चळवळीद्वारे गांधींच्या विश्वस्त संकल्पनेचा विस्तार केला की नाही ते पहाणे.

२) भूदान चळवळीतून उदयास आलेल्या नवकल्पनाचा अभ्यास करणे.

३) विनोबांचे भूदान आंदोलन पक्षविरहित होते का नाही ते पहाणे.

४) सर्वोदय विचाराचा विकास व प्रसार भूदान चळवळीद्वारा केला की नाही ते पहाणे.

५) भूदान चळवळीच्या अपयशाची कारणे शोधणे.

**संशोधन पद्धती :-**

सदर संशोधन पेपरमध्ये विष्लेषणात्मक, मिमांसात्मक, पृथकात्मक पद्धतीचा अवलंब केला जाणार आहे. त्यासाठी प्राथमिक, दुय्यम साधनांचा आधार घेतला जाणार आहे.

**विषय विश्लेषण :-**

भूदान ही कल्पना विनोबांना अकस्मात सुचलेली कल्पना नव्हती. स्वातंत्र्यपूर्व कालखंडापासून विनोबा 'भूमी'शी निगडीत गोष्टींवर विचार करीत होते. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात केलेले चिंतन प्रत्यक्षप्रयोग यातून स्फुरलेला हा अस्सल भारतीय विचार होता.भारत-पाकिस्तान फाळणी झाल्यावर पाकिस्तान मधून निर्वासित भारतात आले. पाकिस्तानमध्ये त्यांच्याकडे जेवढी जमीन होती, तेवढी त्यांना दिली जात होती. मेव भागात अशा लोकांचे पुनर्वसन करण्याचे काम विनोबा पंडित नेहरूंच्या विनंतीवरून करत होते. या लोकांमध्ये काम करताना 'भूमिहिनांचा' प्रश्न निर्माण झाला. यावर उपाय म्हणून विनोबांनी पंजाबचे मुख्यमंत्री डॉ. गोपीचंद भार्गव यांना 'बड्या जमीनदारांकडील पाच टक्के जमीन काढून घेऊन भूमिहीनांना दोन दोन एकर जमीन द्यावी असा प्रस्ताव दिला.' ही मागणी मुख्यमंत्र्यांनी सिद्धान्त स्वरूपात मान्य झाली. परंतु कायदेशिररित्या ही मागणी अडचणीची ठरली. भूमीहिनांनी सत्याग्रह करण्याचे ठरविले असता विनोबांनी त्यांची समजूत काढली. परंतु विनोबांच्या मनात.'भूमिहिनांना जमीन कशी देता येईल?' या प्रश्नाचे घर केले. विनोबांच्या या प्रश्नाचे उत्तर त्यांच्या सर्वोदय विचारात मिळते.

**सर्वोदय विचार :–**

समाजातील शेवटच्या माणसाचा उत्कर्ष साधणे, जे रंजले गांजले आहेत त्यांना हात देणे या ब्रिटिश तत्वज्ञ रस्कीनच्या विचारावर आधारलेली संकल्पना म्हणजे सर्वोदय विचार.

या रस्कीनच्या सर्वोदय विचाराचा प्रभाव गांधीजींना पडला. गांधींनी या विचाराचा विस्तार केला. गांधींच्यामते 'सर्वासाठी प्रत्येक जण व प्रत्येकासाठी सर्वजण' ही भावना समाजाच्या सर्व थरात पसरली पाहिजे. अन्यायाचा प्रतिकार अहिंसात्मक रितीने व सामुदायिक स्वरूपाने सत्याग्रहाने केला पाहिजे. अशा कृतीची शिकवण सर्वोदय देत असतो. म्हणून गांधीजींना 'सामुदायिक साधुत्वाचा प्रथम प्रणेता' असे म्हटले जाते. मनुष्य मुलतः सत्प्रवृत्त आहे. हा सिद्धांत सर्वोदयाचा पाया आहे. ती सत्प्रवृत्ती जागृत व क्रियाशिल करणे सर्वोदयाचे कार्य आहे.

गांधीजींच्या या विचारप्रेरणांचा प्रभाव विनोबांवर होता. विनोबांनी गांधीच्या निधनानंतर आदर्श व्यवहारावर आधारित समाजरचना निर्माण करण्यासाठी सर्वोदय जीवनदृष्टी विषद केली.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लोकसत्ताक सरकारच्या स्थापनेमुळे भारतातील सामाजिक, आर्थिक, राजनैतिक वातावरणामध्ये परिवर्तन घडून आले. सर्वोदय विचारकांना समाज परिवर्तनासाठी काम करण्याची नवी संधी प्राप्त झाली. नवीन व्यवस्थेतील प्रश्न, जमीनदारी पद्धत, संपत्तीची विषम विभागणी अन्यायपूर्ण सामाजिक, रुढी, भ्रष्ट सामाजिक वातावरण या समस्याबरोबर अर्ध विकसित, दारिद्रपीडीत, अंधश्रद्धा अशा खेड्याच्या समस्या कशा सोडविता येतील? या संदर्भात सर्वोदय विचारकांची भूमिका काय? या संदर्भात नवीन समाज व्यवस्था निर्मितीची मुख्य तीन मार्ग असतात.

१) **पहिला मार्ग कत्तीलाचा :–** हा मार्ग ज्यांनी दुबळ्या, असाह्य जनतेचे शोषण केले. त्यांनी कत्तल हा हिंसेचा मार्ग स्वीकारला. आधुनिक युगात तलवारीच्या सिद्धाताचे व्यावहारिक व नैतिक समर्थन होऊ शकत नाही. हिंसेमुळे एखादी समस्या सुटल्यासारखे वरवर पहाता दिसते. परंतू एकासमस्ये पाठीमागे अनेक नव्या समस्या निर्माण करते.

२) **दुसरा मार्ग कायद्याचा किंवा सरकारी कारवाईचा :–** परंतू लोकशाहीतसुध्दा कायदा जर लोकांच्या स्वेच्छेचा दयोतक नसेल तर तोही हुकुमशाहीइतकाच जुलमी बनू शकतो. तसेच कायद्याच्या मार्फत प्रश्नांची सोडवणूक करावयाची म्हटले तर त्यात लोकांच्या क्रयशीलतेला व स्वातंत्र्याला वाव राहत नाही. बिनोबा व इतर सर्वोदय विचारक सामाजिक व आर्थिक दोष दूर करण्यासाठी कायद्याची मदत घेण्याच्या विरोधात नाहीत परंतू कायदे कागदावरच राहु नयेत यासाठी लोकांची मानसिकता तयार करणे आवश्यक असते.

३) **तिसरा मार्ग :–** विनोबांच्या मते, परिवर्तनाचे स्वरूप दुहेरी नसून तिहेरी असते. प्रथम हदय परिवर्तन नंतर त्याचा परिणाम जगण्याच्या पध्दतीतील परिवर्तनात दिसतो. शेवटी त्याचा परिणाम सामाजिक संस्थांच्या स्वरुपात झालेले परिवर्तन होय. शोषित व शोषणकर्ते अशा सर्व समाजामध्ये परिवर्तनाच्या आवश्यकतेचे आकलन जागावे यासाठी करुणेच्या मार्गाची आवश्यकता असते.

विनोबा समाजपरिवर्तनासाठी तिसऱ्या पर्यायाचा स्विकार करतात. गांधींनी सत्याग्रहाचे सांगितलेले भिन्नमार्ग नव्या परिस्थितीत वापरता येणार नाहीत. क्रांतीकारक परिवर्तनाच्या दिशेने पाऊल म्हणून विनोबांनी भूमिहीन शेतकऱ्यांचा प्रश्न निवडला. १९५१ मध्ये त्यांनी तेलंगणात भूदान यज्ञ सुरू केला.

सर्वोदय विचाराचा प्रसार विनोबा भूदान यज्ञाच्या माध्यमातून केला. मानवी हृदयातील कारुण्यभावाला आवाहन करून न्यायभावना जागृत करण्याचा एक अभिनव प्रयत्न केला. वस्तूतः गांधीजींना आपल्या शेवटच्या जीवन कार्याच्या संदर्भात हाच मार्ग चोखळला होता. धर्मवेड्यांच्या आंधळेपणावर व दुःखी संतप्त व्यक्तीच्या क्रुरतेवर एकमेव उपाय प्रेमपुर्वक हृदयाला आवाहन करणे, या मार्गाचा अवलंब केला.

भूदान चळवळीचे तत्वज्ञान अभ्यास त्यापूर्वी भारतातील भौगोलिक स्थिती व समस्याचा थोडक्यात आढावा घेणे गरजेचे होते. त्या पार्श्वभूमीवर भूदानचळवळीचे महत्व आपल्या लक्षात येते. संपूर्ण भौगोलिक स्थितीचा आढावा घेणे सदर संशोधन पेपरमध्ये अशक्य आहे. या पेपरच्या मर्यादा आहेत.

भारतातील भुसंपत्ती तपशील (आकडे कोटी हेक्टर)

| तपशील | | |
|---|---|---|
| एकूण भौगोलिक प्रदेश | – | ३२.६८ |
| किती जमिनीविषयी माहिती उपलब्ध आहे. | – | २६.६८ |
| लागवडीखाली नसलेली जमीन | – | ४.७५ |
| कुरणे, जंगले व उपयोगात नसलेली एकूण जमीन | – | ११.८१ |
| लागवडीखाली असलेली जमीन | – | ११.८७ |
| एकाहून अधिक पिकांखालील जमीन | – | १.३२ |

(संदर्भ– बर्वे रा. का. भेण्डे सुभाष, भारताच्या आर्थिक समस्या, पृ.क्र. ७)

या पार्श्वभूमीवर लोकसंख्येचा विचार केला तर १९५०–५१ मध्ये ७० टक्के लोकसंख्या शेतीवरती अवलंबून होती. भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात ५१.३ टक्के वाटा होता. एखाद्या वर्षी दुष्काळ पडल्यास शेतीक्षेत्रातील उत्पन्न घटते. इतर देशांच्या तुलनेने भारतातील शेती क्षेत्रावर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण अधिक असल्याचे खालील आकडेवारीवरून स्पष्ट होते.

| देश | टक्के |
|---|---|
| इंग्लंड | ४% |
| अमेरिका | ६% |
| ऑस्ट्रेलिया | १०% |
| फ्रान्स | १८% |
| भारत | ७०% |

(संदर्भ– बर्वे रा.का. भेण्डे, सुभाष भारताच्या आर्थिक समस्या, पृ.क्र. ३८)

थोडक्यात वरील आकडेवारीवरून जमिनीचे प्रमाण व जमिनीवरील अवलंबून असणाऱ्यांची संख्या याचे व्यस्त प्रमाण आढळते.

**भुदान तत्वज्ञानावरील सर्वोदयाचा प्रभाव :–**

१) सर्वोदय विचारकांच्या मते, ज्याप्रमाणे हवा, पाणी यांची सर्वांनाच आवश्यकता असते तशी जमिनीची मालकी देखील सर्वांची सामुहिक असली पाहिजे.

२) परस्पर विश्वास व सर्वांचे भले करण्याची प्रेरणा हाच सामान्य भाव सर्वोदयाच्या अर्थक्षेत्रात प्रतिष्ठित आहे. समताधिष्ठित समाजात स्पर्धेला स्थान असता कामा नये.

३) गांधीजींनी केंद्रीकरणाचा धोका ओळखला होता. शेती व उद्योगांचे केंद्रीकरण करणे म्हणजे दुसऱ्याच्या शोषणाला खुली परवानगी देणे होय.

गांधीजी 'प्रचंड उत्पादनाऐवजी' 'प्रचंड जनसमुदायाने केलेले उत्पादन' इष्ट मानले आहे.

४) गांधी व सर्वोदय विचारक माणसाच्या सुखसमाधानाच्या विचारामुळे यंत्राचा अनावश्यक उपयोग टाळावा असे मत नोंदवतात. यांत्रिकीकरणामुळे समाजात एकसारखेपणा व सैनिकीपणा दाखल करतेच परंतु त्यामुळे कामगार व्यक्तीशा स्वतःची सृजनशिलता व खासगुणांना गमावून बसतात.

५) श्रमप्रतिष्ठा– गांधीजी स्पष्ट करतात, आपल्या देशात श्रम कसे वाचवावेत? हा प्रश्ननसून काम कसे पुरवावे ही समस्या आहे. जेथे शक्य आहे तेथे तरी निदान आवश्यक मानवी परिश्रमाची जागा यंत्राला देऊ नये असे स्पष्ट करतात. थोडक्यात सर्वोदयाचे अर्थशास्त्र श्रममूल्यांवर आधारलेले असेल असे स्पष्ट करतात.

६) विश्वस्त सिद्धांत :– एखाद्या व्यक्तीजवळ संपत्ती व खास गुणांमुळे अधिक प्रमाणात व्यक्तीजवळ संपत्ती व त्या अनुशंगाने अतिरिक्त संपत्तीचे निर्माण झाल्यास त्याने त्या संपत्तीचे विश्वस्त रहावे. समाजाच्या उन्नतीसाठी व इतरांच्या कल्याणासाठीची तिचा वापर करावा असे स्पष्ट करतात.

हा सिद्धांत विनोबांच्या संपत्ती व जमिनीची मालकी नष्ट करण्याचे मुलस्त्रोत आहे. स्वामित्वाच्या विसर्जनाचा सिद्धांत विनोबा या आधारावर मांडतात. स्वामित्वाची भावना संपुष्टात आली की इतरांचे शोषण करण्याची व सत्ता गाजवण्याची इच्छा हे अधिकार नाहीसे झाले की जीवनाचे संदर्भ बदलतात. साऱ्या समाजाच्या भल्यामध्येच व्यक्तीच्या विकासाचा अंतर्भाव असतो. भुदान–ग्रामदान आंदोलनाचे घोषवाक्य देखील विनोबांनी 'सबै भुमी गोपालकी, सब संपत्ती रघुपती की' असे होते.

७) वर्ग, जात, पंथमुक्त समाज :– सर्वोदय विचारातील समतेची प्रेरणा वर्गहीन समाजाचा आदर्श उभा करते. समाजाच्या एकापेक्षा अधिक वर्ग असल्यास राजकीय स्वातंत्र्य व आर्थिक समतेला शुन्य अर्थ राहतो असे स्पष्ट करतात.

विनोबांच्या मते, सर्व धर्माविषयी समान आदराची भावना शेवटी साऱ्या मानव जातीसाठी एक धर्म भावना सहन विकसित करील. सर्व धर्मात जे महान चांगले असेल त्या सर्व तत्वांना 'सर्वधर्म समभाव'मध्ये स्थान असेल असे स्पष्ट करतात.

या विचारावर आधारित भूदान चळवळ उभी राहिली. याठिकाणी देखील सर्वोदय विचाराचे तत्वज्ञान मर्यादित मांडले आहे. सदर संशोधन पेपरची मर्यादा आहे.

**भूदान चळवळ :–**

संपुर्ण भूदान चळवळीचा आढावा घेणे इथे अशक्य आहे. थोडक्यात भूदान किती प्रमाणात घडले याचा आढावा घेण्यात आला आहे.

**विनोबांचा भूदान विषयक दृष्टीकोन :–**

विनोबांच्या कांचन मुक्ती प्रयोगाचा निष्कर्ष भूदान होता. पैसे आणि सोने यांच्या शिवाय जगता येऊ शकते हे सिद्ध करण्याचा प्रयत्न विनोबांनी केला. व्यक्तीगत जीवनात ते त्यांनी सिद्ध केले होते. समूह जीवनात ते सिद्ध करता येईल यावर त्यांचा विचार चाललेला होता. पवनारच्या आश्रमात त्यांनी ऋषी शेतीचा प्रयोग केला होता. आश्रमीय जीवनात ती त्यांनी

सिद्ध करून दाखवले. जे व्यक्तीगत जीवनात त्यांनी प्रयोग केले ते त्यांनी समाज जीवनाच्या प्रयोगशाळेत सिद्ध केले.
भूदानाची आवश्यकता का?

या प्रश्नाचे विवेचन करताना 'भूदान–ऐतिहासिक आवश्यकता' या आपल्या भाषणात विनोबा म्हणतात, ''ज्यांच्याजवळ जमीन आहे त्यांनी ती स्वेच्छापूर्वक बिनजमीनवाल्यांना द्यावी. हा. माझा प्रयत्न इतिहासाविरुद्ध आहे असे मला वाटत नाही. रशियातल्या क्रांतीसारख्या घटनापूर्वी कधी घडली नव्हती, तरी रशियात ती घडली. तशीच ही सुद्धा घडू शकेल. मी जे करतो ते इतिहासाच्या विरुद्ध नाही. ती ऐतिहासिक आवश्यकता आहे. ती काळाची मागणी आहे, असे मी मानतो. क्रांती टाळणे हा माझा उद्देश नाही. मी हिंसक क्रांतीपासून देशाला वाचवू इच्छितो. जमिनीचा प्रश्न शांतीमय मार्गाने सोडविण्यावर आपल्या देशाची भावी सुखशांती अवलंबून आहे. कायद्याच्या बंधनांनी आपले काम अडून राहणार नाही. श्रीमंताकडून जमीन घेतो. आणि गरिबांना सरळ देऊन टाकतो.''

जमिनीचे फेरवाटप करण्याच्या निमित्ताने समाजाची नवी घडी सर्वोदयाच्या पायावर बसविणे विनोबांना साध्य करावयाचे होते. विनोबा कार्यकर्त्यांना स्पष्ट सांगतात जमीन हातात पडते का नाही. याकडे लक्ष न देता जमीन मिळण्यास मनोवृत्ती तयार करणे हा आहे. भूदानातून फक्त जमीन मिळवायची नसून सर्वोदय विचाराचा माणूस घडवायचा आहे.

**भूदानाची सप्तविध उद्दिष्ट्ये :–**

विनोबांनी भूदानाची सप्तविध उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहेत.

१) दारिद्र्याचे निवारण

२) जमीन मालकांच्या मनात प्रेमभाव उत्पन्न करून देशातील नैतिक वातावरण सुधारणे.

३) व्यक्तीतील परस्परांविषयीचा प्रेमभाव दृढ करून समाजाला सबल करणे. भूमिहीन लोकात इतरत्र आढळणारा वर्गद्वेष नष्ट करणे.

४) यज्ञ, दान आणि तपाच्या त्रिविधपायावर आधारलेल्या भारतीय संस्कृतीचे पुनरुज्जीवन करणे.

५) देशात शांतता नांदवणे.

६) त्या योगाने जगाच्या शांतीला मदत करणे.

७) एकाच व्यासपीठावर सर्व पक्षांना येण्याची संधी देणे व एकत्र काम करण्याचे शिक्षण देणे.

भूदानाचा थोडक्यात आढावा :–

दि. ८ एप्रिल १९५१ रोजी हैदराबाद जवळील शिवरामपल्ली येथे सर्वोदय समाजाचे तिसरे अधिवेशन भरणार होते. त्यासाठी ८ मार्च १९५१ रोजी वर्धा येथील पवनार आश्रमातून चालत निघाले. अधिवेशन संपल्यानंतर विनोबा तेलंगना भागातील लोकांचे प्रश्न समजावून घेत होते. १८ एप्रिल १९५१ रोजी नलगोंडा जिल्ह्यातील शिवरामपल्ली येथे पोहोचले. याच दिवशी विनेबांना रामचंद्र रेड्डी यांच्याकडून १०० एकरांचे भूदान मिळाले. तेलंगणात भूदान मिळाले. त्याचे वितरण करण्यासाठी विनोबांनी उम्मेतुल केशवराव (संयोजक), संगम लक्ष्मीबाई, कोंदडराम रेड्डी यांची समिती नेमली. या समितीता 'शून्य समिती' म्हटले गेले. हैदराबाद सरकारने भूदानात मिळालेल्या जमिनीचे वितरण सरकार करेल अशी घोषणा केली. विनोबांच्या नापसंतीमुळे सरकारने ही घोषणा केली. विनोबांच्या नापसंतीमुळे सरकारने ही घोषणा मागे घेतली.

१८ एप्रिल ते २६ जून १९५१ रोजी सेवाग्रामला परत येईपर्यंत १३ हजार एकर जमिन भूदानात मिळाली.

**दिल्ली यात्रा :–** १२ सप्टेंबर १९५१ रोजी विनोबा, पं. नेहरूच्या आमंत्रावरून नियोजन आयोगाच्या बैठकीसाठी दिल्लीला निघाले. विनोबांची पदयात्रा महाराष्ट्र, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश, दिल्ली या चार राज्यातून गेली. दोन महिन्यात १८ हजार एकर जमीनदान मिळाली.

**उत्तरप्रदेश :–** २४ नोव्हेंबर १९५१ रोजी विनोबा दिल्लीमार्ग उत्तरप्रदेशात प्रवेश केला. एप्रिल १९५२ मध्ये सेवापुरी (वाराणसी) आश्रमात सर्वोदय संमेलन भरले. या अधिवेशनात सर्व सेवा संघाने भूदान पदयात्रा व चळवळीची जबाबदारी स्विकारली. उत्तर प्रदेशा ३७५० मैल यात्रेत, २५७ मुक्काम झाले, १२ हजार दात्यांकडून २ लाख ९५ हजार ५४ एकर जमीन मिळाली. भूदान–यज्ञ समिती स्थापन झाली.

**बिहार :–** १४ सप्टेंबर १९५२ रोजी विनोबा कर्मनाश नदी ओलांडून विनोबा बिहारमध्ये गेले. बिहारमध्ये त्यांना संपत्तीदानाची संकल्पना सुचली. १९ सप्टेंबर १९५३ रोजी विनोबा देवघर येथील वैद्यनाथ मंदिरात आपल्या सहकाऱ्यांसह गेले असता त्यांच्यावर हल्ला झाला. या हल्ल्यात त्यांचा एक कान कायमचा अधू झाला.

या दौऱ्यात १९५३ पासून जयप्रकाश नारायण भूदान चळवळीत सामील झाले. १९५४ मध्ये त्यांनी या चळवळीस जीवनदान दिले. १४ सप्टेंबर १९५३ ते ३१ डिसेंबर १९५४ या काळात भूदान पदयात्रेत २३ लाख एकर जमीन मिळाली. पुढे विनोबांनी दोन वेळा बिहारमध्ये भूदान यात्रेत सहभाग घेतला. जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली प्रजासमाजवादी दल या कार्यात सामील झाले. बिहार खादी समिती व बिहार गांधी स्मारक निधी या संस्था भूदान कार्यात सहभाग घेवू लागल्या. शंकरराव देव, दादा धर्माधिकारी, धीरेंद्र मुजुमदार यांच्या पदयात्रा निघाल्या.

बिहारमध्ये गीरीवरप्रसाद नारायणसिंह यांनी १,१५,००० एकर जमीन भूदानात दिली. रामगढच्या राजाने १ लाख एकर व धनबादच्या राजाने १० हजार एकर पालकोटच्या राजाने ४४,५०० एकर जमीन दान दिली. १४ सप्टेंबर १९५२ ते ३१ डिसेंबर १९५४ या काळात विनोबांची भूदान पदयात्रा ८३९ दिवस चालली. ६९४ मुक्काम झाले. ८८७५ किलोमीटर पदयात्रा झाली. २ लाख ८४ हजार ४२० दानपत्रे मिळाली. २२ लाख ३२ हजार ४७४ एकर भूदान मिळाले.

**बंगाल प्रांत :–** १ जानेवारी १९५५ रोजी विनोबांनी बंगाल प्रांतात प्रवेश केला. २५ दिवसात ११७० दात्यांकडून १८५३ एकर भूदान मिळाले.

**ओरिसा :–** ओरिसा भूदान यांत्रेचे वर्णन विनोबांनी शक्तीयात्रा असे केले. ओरिसात राजे व जमीनदार यांची परिषद 'गणतंत्र परिषदेने' ग्रामदानाला विरोध केला. ओरिसामध्ये ९५ हजार ७५७ दाते, २ लाख हजार २७७ एकर भूदान, २२०० कुटुंबात ३७ हजार ८२२ एकर वितरण व ८१२ ग्रामदान असे प्राप्त झाले.

**आंध्रप्रदेश :–** २ ऑक्टोबर १९५५ राजी विनोबा ओरिसा यात्रा संपून आंधप्रदेशात गेले. आंधप्रदेशात 'मौनप्रार्थना' उपक्रम सुरू केला.

**तमिळनाडू :–** १३ मे १९५६ रोजी विनोबा तमिळनाडूला आले. १६ ते २२ नोव्हेंबर सर्व सेवा संघाची बैइक झाली. शंकरराव देव यांची पदयात्रा ४५ दिवस चालली, त्यात ३०० एकर जमीन दान म्हणून मिळाली.

**केरळ :–** केरळमध्ये विनोबा १८ एप्रिल १९५७ रोजी पोहोचले. येथे शांतीसेनेची कल्पना उदयास आली. ११ जुलै १९५७ रोजी शांतीसेना स्थापन केली. केरळ यात्रेत २२४ दात्यांकडून १५७१ एकर भूदान व ३०१ ग्रामदाने मिळाली.

**कर्नाटक :–** २४ ऑगस्ट १९५७ रोजी विनोबा कर्नाटकात आले. २१ व २२ सप्टेंबर १९५७ रोजी येलवाल येथे ग्रामदान परिषद भरविण्यात आली. 'जय जगत्' हा मंत्र विनोबांनी सर्वप्रथम उच्चारला.

**महाराष्ट्र :–** २३ मार्च १९५८ रोजी विनोबा कर्नाटकातून महाराष्ट्रात आले. ३० मे १९५८ रोजी पंढरपुरात सर्वोदय समाजाचे दहावे संमेलन झाले. याचे दौऱ्यात 'अक्राणी' पहिले तालुकादान झाले.

याशिवाय गुजरात, राजस्थान, पंजाब, काश्मीर, हिमाचल प्रदेश, मध्यप्रदेश, आसाम या प्रांतातून विनोबांनी भूदान चळवळीद्वारे लाखो एकर जमिनीचे वाटप केले. भारताबाहेर देखील नेपाळ देशात भूदान चळवळीचा विस्तार झाला. भूदान चळवळ १९५१ ते १९६९ पर्यंत १८ वर्षे चालू राहिली.

**भूदानातून उदयास आलेल्या नवकल्पना :–** भूदान चळवळीच्या माध्यमातून विनोबांनी अनेक नवकल्पनांची मांडणी केली. त्याचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे–

१) संपत्तीदान यज्ञ :– भूदान चळवळीच्या काळात ज्या कल्पना उदयाला आल्या त्यातील महत्वाची कल्पना म्हणजे संपत्तीदान यज्ञ होय. विनोबांच्या मते व्यक्तीने आपल्या बुद्धीकुशलतेने, प्रयत्नाने धन मिळविले तरी ते केवळ आपल्या स्वतःपुरते नाही. ईश्वराने सर्व समाजाच्या उपयोगासाठी आपणास दिले आहे. हे तत्व संपत्तीदानाच्या मागणीमागे आहे. आपल्या इच्छेनुसार दात्याने संपत्तीच्या विनियोगासंबंधी अवश्य सुचना करणे अपेक्षित होते. संपत्तीदान यज्ञातील दानाचा कोणाही एका व्यक्तीकरीता उपयोग होणार नव्हता. त्याचा उपयोग विहिरीकरीता सिमेंट खरेदी करणे किंवा दोन–तीन शेतकऱ्यांना मिळून एक बैल जोडी घेणे यासारख्या सामुदायिक कामासाठी करण्याचे ठरले.

२) ग्रामदान :– ग्रामदान ही भूदान चळवळीतील एक महत्वाची नवसंकल्पना होय. गावची संपुर्ण जमीन 'मंगरोठ' या गावाने दिली. 'सबै भूमी गोपालकी' या उक्तीप्रमाणे गावातील सर्व शेती सामुहिक मालकीची असेल. गावातील सामुदायिक शेतीवर देखरेख ठेवण्यासाठी व गावचा कारभार पाहण्यासाठी दहा लोकांच्या नेतृत्वाखाली सर्वोदय मंडळाची नेमणूक करण्यात आली. शेती व शेतीस सुधारणा, पशुपालन, बागबगीच्या ग्रामोद्योग इत्यादी खाती तयार करून ती दहापुढाऱ्यांकडे सोपविण्यात आली. त्यांनी एकत्र बसून सर्व गावकारभाराचा विचार करून आपापली खाती सांभाळावी. तसेच जमिनीची मालकी सर्वोदय मंडळाकडे राहिल. अन्न, वस्त्र, निवारा या बाबतीत गाव स्वावलंबी करण्याच्यादृष्टीने सर्वोदय मंडळाने प्रयत्न करावेत असे स्पष्ट करण्यात आले. ग्रामदानात धार्मिकतेला स्थान दिले जात नाही. ग्रामदानाच्या अंतिम उद्देश लोकांना तोडण्यासाठी नसतो, जोडण्यासाठी असतो. अशी चळवळीची भूमिका होती.भूदान चळवळीद्वारा गृहोद्योग, ग्रामोद्योग इत्यादी उद्योग तसेच सर्वोदय ग्रामात शिक्षण, औषधोपचार, आरोग्यवर्धन इत्यादी संस्था काढण्यात आल्या.

३) सर्वोदय पात्र :– 'मूठभर धान्य आणि जगभर शांती' या सुत्राच्याआधारे सर्वोदय पात्र ही संकल्पना विनोबांनी मांडली. विश्वशांतीकरता समाजरचना अमूलाग्र बदलून अशांतीची बीजेच नाहीशी करण्याचे ग्रामदानाचे कार्य व सैन्य मुक्तीच्या दिशेने प्रथम पाऊल म्हणून निदान देशातील अंतर्गत रक्षणात तरी सैन्य व पोलिसांचा उपयोग करण्याची गरज पडू नये. याकरिता देशभर नित्य सेवा करणाऱ्या शांती सैनिकांची सेना उभारण्याचे कार्य आम्हाला पसंत आहे. त्या कार्यास आमची संमती आहे. हे दर्शवण्यासाठी आपल्या घरात सर्वोदय पात्र स्थापन करावे. त्यात घरातील सर्वात लहान मुलांच्या हाताने मुठभर धान्य टाकत जा. हा विनोबाजींचा संदेश घराघरातून पोहचविण्याचा प्रयत्न झाला. विनोबांच्या मते, सर्वोदय पात्र हा त्यांचा सर्वश्रेष्ठ

विचार आहे. भारताचे राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी राष्ट्रपती भवनात सर्वोदय पात्र ठेवले हाते. मद्रासच्या शंकराचार्यांनी सर्वोदय पात्र कांचीपीठात ठेवले होते. हे या योजनेचे यश होते.

यासारख्या विविध नव उपक्रमांचा उदय भूदान चळवळीतून झाला.

**सर्वोदय भूदान चळवळ मूल्यमापन :–**

भूदान चळवळीच्या उपयशाची चर्चा :–१) विनोबा भूदान वाटपाच्या संदर्भात अनेकवेळा चिंतीत असत. उदा. १९६१ मध्ये आसामकडे जात असताना त्यांना बिहार प्रांतात मुंगेर जिल्ह्यात ४५००० हजार एकर जमीन मिळाली होती. मात्र त्यापैकी ३००० हजार एकर जमिनीचे वाटप करण्यात आले होते. १०००० एकर जमीन वाटप व्हायचे होते, विनोबां संतप्त झाले. त्यावेळीस सभेत विनोबांनी ध्वनीक्षेप आपल्या हाती होत. 'अब तक सिर्फ तीन हजार एकड जमीन बंटी है । दस हजार एकड जमीन बंटनेलायक युही पडी है । मतलब दस हजार आदमी की रोटी छिनी हुई है । अगर मैं हुकुमत में होता, तो तुम सबों को फांसी दे देता ।' वरील वाक्यातून विनोबांची हतबलता स्पष्ट होते.

२) विनोबांच्या मृत्युनंतर भूदान (सर्वोदय) आंदोलन कमकुवत झाले. देशाची राजकीय, आर्थिक, सामाजिक स्थितीत बदल झाला. या पार्श्वभूमीवर भूदान ऊपेक्षाचा विषय झाला.

भूदान बोर्डची निमित्ती करण्यात राजकीय प्रश्नांची रूची दाखवली नाही. बऱ्याच राज्यांमध्ये भूदान बोर्डचे अस्तित्व दिर्घ काळ नव्हते. या बोर्डना पुरेसे अनुदान काही ठिकाणी दिले नाही तर काही ठिकाणी अनुदानच दिले नाही.

विना अनुदान, बोर्डशिवाय जमिनीचे वाटप करण्याची अपेक्षा बोर्डकडून ठेवली गेली.

३) भूदान शेतकऱ्यांना इतर छोट्या शेतकऱ्याप्रमाणे सरकारद्वारे सवलती मिळाल्या नाहीत. हरियाणामध्ये अडीच हेक्टर पर्यंतच्या शेतकऱ्यांना कर सवलत देण्यात आली. मात्र भूदान प्राप्त शेतकऱ्यांना या सवलती पासून वंचित ठेवले. कारण जमीन–भूदान यज्ञ बोर्डच्या नावावरती होती. भूदान शेतकऱ्यांना कर्ज देण्याबाबत देखील दुजाभाव करण्यात आला.

४) भूदान शेतकऱ्यांना साधनदान देण्यासंदर्भात विनोबांनी भूमिका मांडली. मात्र त्याचे प्रतिकात्म स्वरूप राहिले. सर्व सेवा फॉर्मची १९७० साली स्थापना करण्यात आली. या सर्व सेवा फॉर्मने भूदान जमीन विकासासाठी प्रयत्न केले. खासकरून तमिळनाडू करण्यात आले.

५) गांधीजींच्या विश्वस्त संकल्पनेवर लोकांचा विश्वास होता. मात्र विनोबांच्या स्वामित्व विसर्जनावर त्यांचा विश्वास नव्हता. विनोबा जमिनीची संपत्तीची मालकी सोडा असे सांगत होते. त्यामुळे गुजरातमध्ये वातावरण भूदान आंदोलनाच्या विरोधात गेले.

६) विनोबांच्या सातत्याने बदलाच्या– लोकबंधू डोनाल्ड ग्रुम यांनी भूदान चहवळीच्या अपयशाची कारण मिमांसा केली. त्यांच्या मते विनोबा प्रज्ञाशील असल्यामुळे त्यांना नवेनवे कार्यक्रम सुचत गेले. कार्यकर्ते विनोबांच्या कल्पनांप्रमाणे त्यांच्या पाठीमागे धावत सुटले. भूदान वितरणाच्या जागी कार्यकर्ते थांबत नसत. विनोबांच्या मागेपुढे चालत असत. आंदोलनाचा विकास आणि नव्या कल्पना पुढे येत गेल्यावर कार्यकर्ते मुळ काम सोडून नव्या कल्पनांच्या मागे धावत सुटले. लोकप्रियतेच्या मागे लागले.

संपत्तीदान कार्यक्रम राबविण्यात झालेल्या चुका भूदानाशी तो कार्यक्रम जोडता न आल्यामुळे अपयशी झाला. ग्रामदान कार्यक्रम ग्रामदानी गावामधील सर्व लोकांना समजला नाही. भूदानाचा कार्यक्रम पुर्ण होण्यापूर्वीच ग्रामदान आल्यामुळे भूदानाचे कार्यकर्ते तिकडे वळले. भूदान, ग्रामदान, शांतीसेना, सर्वोदय पात्र, सुतांजली. असे नवे नवे कार्यक्रम पुढे येत गेले. जुने कार्यक्रम मागे पडत गेले. स्थानिक प्रश्नांवर स्थानित उत्तरे शोधण्याचा प्रयत्न झाला नाही.

७) आंदोलनातून राजकीय पक्षांनी लाभ होत नाही. हे लक्षात येताच अनेक राजकीय पक्षाचे कार्यकर्ते आंदोलातून बाहेर पडले.

८) १९७१ मध्ये सर्व सेवा संघाने 'मतदान प्रबोधन' कार्यक्रम हाती घेतला. मूळ कामे बाजुला राहिली. कार्यकर्ते भूदान–ग्रामदान सोडून वेगळ्याच कार्यक्रमाच्या मागे लागले.

१९७६ च्या ऑक्टोबरमध्ये विनोबांनी एक वर्षासाठी मौनव्रत पत्करले. परिणामता सर्व सेवा संघ क्रियाशील नव्हता. भूदान बोर्ड/समितीवर स्वतःला अनुकूल असे लोक नेमण्याचा सपाटा राज्य सरकारांनी लावला होता. ज्यांचा याविषयाशी काहीही संबंध नव्हता, असे लोक समित्यावरती आले.

९) भ्रष्टाचार प्रकरण :– १९६२ मध्ये उत्तर प्रदेशातील एका सभेत भारताचे गृहमंत्री लालबहादुर शास्त्री यांनी सर्वसेवा संघाचे प्रमुख धिरेंद्र मुजुमदार यांच्या उपस्थितीत उत्तर प्रदेशातील भूवितरण कार्यातील असंख्य भ्रष्टाचाराच्या प्रकरणात कार्यकर्त्यांना जबाबदार धरले. चळवळीने या आरोपांचा इन्कार केला नाही.

१०) कार्यकर्त्यांचा अभाव :– श्री. रावसाहेब पटवर्धन यांच्यामते एक विनोबा आणि काही हाताच्या बोटावर मोजण्या इतकी माणसे सोडली तर आंदोलनाला समाजक्रांतीचे रूप देऊ शकतील, इतक्या तोलाची, संख्येची माणसे भूदानाजवळ नव्हती.

जयप्रकाश नारायण यांच्यामते, बिहारमध्ये जाहिरात देऊन जीवनदानी मागविण्यात आले. येतील त्यांना एक कंबळ आणि १० रुपये दरमहा मिळतील. असे अमिष दाखविण्यात आले. अमिष दाखवून जीवनदायी कसे मिळणार असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

११) नोकरशाहीच्या सहकार्याचा अभाव :– १८ ते २० एप्रिल १९५४ रोजी बोधगया येथे सर्वोदय संमेलन झाले. सदर संमेलनात राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान उपस्थित होते. पंतप्रधानांनी पांठिबा दर्शवला. मात्र सरकारी अधिकाऱ्यांना या चळवळीत भाग घेण्यास विरोध केला. भाग घ्यावयाचा असेल तर सर्वसामान्य नागरिक म्हणून घ्यावा असे आवाहन केले. त्याचे दुरगामी परिणाम झाले. सरकारी अधिकाऱ्यांनी भूदानाला कायदेशीर मदत करणे. कागदपत्रांची वेळेत पुर्तता करणे. सरकारी योजनांच्या माध्यमातून भूमीहिनांना मदत करणे. कमी व्याजदरात कर्जे उपलब्ध करून देणे. भूदान हस्तांरणासाठी कायद्यातील त्रूटी दूर करणे. या कार्यासाठी नोकरशाहीचे सहकार्य मिळणे अपेक्षित होते. मात्र ते मिळू शकले नाही.

१२) सरकारचा नकारात्मक दृष्टीकोन :– राजस्थानातील बिकानेर, छत्तरगढ येथे सलग ८८ हजार ७५० एकर जमीन भूदानात मिळाली. ती फारशी मूल्यवान नव्हती. पुढे पाणी येताच जमिनीचे मुल्य अनेक पटींनी वाढले. सरकारला या जमिनीचा लोभ सुटला. जमिनीच्या कायदेशीरपणाबद्दल शंका घेऊन १९८६ मध्ये ११ हजार बिघे जमीन परस्पर विकली. १९८७ मध्ये राजस्थान सरकारने विधानसभेत कायदा करून भूदान बोर्डच्या कामात हस्तक्षेप करण्यास सुरुवात केली

सरकारी अनुदान कमी करणे, त्रास देणे, कायद्याचे प्रश्न निर्माण करणे, या अडचणींना तोंड देण्याची भूदान कार्यकर्त्यांची तयारी नव्हती. देशभरातल्या सरकारांमध्ये कमीअधिक हाच प्रकार होता.

**परदेशात सर्वोदयाची महती (सर्वोदय चळवळीची सकारात्मक बाजू):–**

विदेशातील लेखक, विचारवंत, पत्रकार, तरुण आणि सामान्य नागरिकांनी देखील भुदानच चळवळीची दखल घेतली. अनेकांनी प्रत्यक्ष भेट देऊन त्यावर लेख लिहिले.

हैलमटेनीसन (प्रख्यात कवीटेनीसन) यांचे पुत्र यांनी भारतात येऊन विनोबांना भेटून भूदान चळवळी संदर्भात चर्चा केली. त्यांनी 'सेन्ट आनंद मार्च' (१९५५) मध्ये पुस्तक लिहिले. भूदानयात्रे संबंधी बी.बी.सी. लंडनवर त्यांनी भाषण दिले. एवढेच नव्हे तर भूदान आंदोलनासाठी निधीसंग्रह करण्यासाइी त्यांनी इंग्लडमध्ये समिती स्थापन केली. ज्या समितीमध्ये बट्रॉर्डरसेल सारखे विचारवंत सामिल झाले होते.

प्रो. डब्लुनॉर्मन ब्राऊन यांनी कोलंबिया विद्यापीठात भाषण देताना भुदान आंदोलनाला भारताच्या नैतिक, धार्मिक आदर्शवाद व वर्तमान केंद्रबिंदू असे म्हटले आहे.

आर्थरमुर (स्टेट्समैन वृत्तपत्राचे पूर्व संपादक) यांच्यामते, भारताच्या पुढे आपला आत्मा हरवण्याचे संकट उभा होते. त्या आत्म्याला पुर्नस्थापित करण्याचे कार्य विनोबांनी केले.

डॅनियल हॉफमन यांनी 'इंडियान सोशल मिरैकल' यांनी या पुस्तकाच्या या प्रस्तावनेत 'मनुष्य हा परस्पर सहकार्य करणारा प्राणी आहे.' हे भूदान आंदोलनाने दाखवून दिले. व्यापक प्रमाणात गेल्या कित्येक दशकात असे उदाहरण आढळत नाही.

इटलीमधील लांझादेलवास्तो हे प्रतिभाशाली लेखक व कलाकार होय. गांधीजींच्या विचाराने ते प्रभावित झाले होते. फ्रान्समध्ये गांधी सिद्धांतावर आधारित त्यांनी आश्रम उभा केला होता. १९५४ भारतात आल्यानंतर विनोबांच्या बरोबर तीन महिने राहिले होते. त्यांनी 'गांधी टू विनोबा– द न्यू पिलग्रिमेज' नावाचे पुस्तक लिहिले.

श्रीलंकेचे आर्यरत्न यांनी सर्वोदयावर आधारित श्रमदान, व्यापक स्तरावर रचनात्मक कार्यक्रम अनेक वर्ष केले.

भूदान चळवळीवरील आक्षेप :–

१) भूदान– ग्रामदान आंदोलन पक्षविरहित सर्व राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांना प्रश्नाशिवाय प्रवेश देण्यात आला होता. तरीदेखील सर्वोदय कॉंग्रेस पक्षाची बी टीम अशा पद्धीतीची टिका करण्यात आली. विनोबांच्या विरोधकांनी/टिकाकारांनी त्यांना 'सरकारी संत' म्हणून संबोधले.

विनोबांनी शासनमुक्त समाजाची मांडणी करून देखील त्यांना कॉंग्रेसचे समर्थक म्हणून संबोधण्यात आले हे विशेष.

२) कॉंग्रेस पक्षाशी संबंधित भूदान आंदोलन आहे अशी टिका भूदान–ग्रामदान आंदोलनावर केली जाते. प्रत्यक्षात विनोबांनी सर्वोदय समाज व सर्व सेवा संघ स्थापनेच्या वेळी सत्ता स्पर्धापासून अलिप्त राहण्याचे व सर्वांचे सहकार्य घेऊन कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याचे निश्चित केले होते. कॉंग्रेस भूदान चळवळीकडे स्वतःचा प्रभाव वाढविण्याच्या दृष्टीकोनातून पहात होती. आंध्रप्रदेशमध्ये कम्युनिष्ठांचा प्रभाव होता. तेलंगणामध्ये पदयात्रा आयोजनात कॉंग्रेस पक्षाशी प्रमुख भूमिका होती. पहिले भूदान करणारे रामचंद्र रेड्डी कॉंग्रेस पक्षाकडेच झुकलेले होते.

विनोबांनी भूदान आंदोलनात सर्व पक्षीय सहकार्य घेतले. समाजवादी नेते जयप्रकाश नारायण हे भूदान चळवळीकडे आकर्षित तर झालेच पण सर्वोदय संमेलन (१९५४) मध्ये जीवनदान त्यांनी घोषित केले. जयप्रकाश नारायण यांच्या प्रभावामुळे आचार्य नरेंद्र देव आणि अशोक मेहता यासारख्या नेत्यांनी भूदान आंदोलनाला सहकार्य केले. किसान–मजदूर

प्रजापार्टी आणि समाजवादी पक्ष यांच्या एकत्रिकरणातून निर्माण झालेल्या प्रजासमाजवादी पक्षांने देखील सहकार्य केले. अनेक समाजवादी कार्यकर्ते पक्ष सोडून भूदान आंदोलनाशी जोडले गेले.(संदर्भ– चोलकर पराग– सब भूमी गोपाल की, भूदान ग्रामदान आंदोलन, खंड–३)

विनोबा, काँग्रेसचे निवडणुका व राजकीय स्वरूप बदलून एक सेवा संघ बनण्याची अपेक्षा करतात. देशातील सर्वात मोठ्या संस्थेचे स्वरूप निवडणुक प्रधान बननेही विनोबांच्या दृष्टीने चिंतेची बाब होती. विनोबा एकवेळ असेही म्हणतात, ''सोचते हैं तो लगता है की इस देश की अहिंसक रचना के लिए क्या सबसे अधिक बाधा देनेवाली वस्तु आज की काँग्रेस न होगी?..... जिस देश की सबसे बडी संस्था चुनाव प्रधान हो, उस देश में अहिंसा की प्रगती के लिए एक बाधक यंत्र खडा हुवा ऐसा आभास होता है ।'' (संदर्भ– विनोबा : भुदानगंगा खंड–३, पुर्वोद्धृत, पृ. १२२१) या वक्तव्यावरून भूदान आंदोलन काँग्रेस पक्षाशी संबंधित होते, हे टीकाकाराचे म्हणने निरर्थक ठरते. सर्वोदयाच्या व्यासपीठावरून काँग्रेस विरोधी भूमिका जयप्रकाश नारायण नवकृष्ण चौधरी स्पष्ट करत होते. याशिवाय प्रजासमाजवादी, जनता पक्षाचे अनेक कार्यकर्ते विनोबांच्या सर्वोदय आंदोलनात सहभागी होते.

निष्कर्ष :–

१) विनोबा सर्वोदय मंडळ पक्षमुक्त संघटना ठेवू इच्छित त्यांचा उद्देश असा समाज. सेवक समाज निर्माण करणे होता की जे हातात सत्ता घेणार नाहीत मात्र सत्तेवरती अंकुश ठेवतील. अशी त्यांची अपेक्षा होती.

२) भूदान यज्ञाद्वारे जमीनदारीचे उच्चाटन केले गेले. ब्रिटिश राजवटीत जमीनदारांच्या हाती ५७% जमीन होती. जमिनीच पुर्नवाटपाद्वारे जमिनीचे विकेंद्रीकरण मोठ्या प्रमाणात करण्यात चळवळ यशस्वी ठरली.

३) भूदान चळवळीने परदेशातील कोणताही आर्थिक लाभ न घेता आंदोलन उभा करता येते हे सिद्ध केले. स्थानिक प्रश्नांना स्थानिक तत्वज्ञानातून उत्तरे शोधली पहिजेत. हे स्पष्ट केले. जगभर भूमी सुधारणेचे प्रयत्न सरकारी माध्यमातून करण्यात आले. भारतात मात्र स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये लोकशाहीची दिर्घ परंपरेचा अभाव असून देखील जनतेच्या इच्छा शक्तीद्वारे भूदान चळवळ उभी व यशस्वी करून दाखविण्यात आली.

४) भूदान चळवळीद्वारे केवळ भूमिहिनांच्या प्रश्नाचे स्वरूप सरकारच्या लक्षात आणून दिले नाहीतर भूमिहिन शेतकऱ्यांचे प्रश्न, शेती करण्यासाठी साधने, विहिरी नाहीत अशांसाठी विहिरीदान, समयदान, स्वच्छता अभियान, डाकूंचे आत्मसमर्पण त्यांचे पुनर्वसन, ग्रामकोष, मंदिर–मशीद–चर्च, सवधर्मियांना स्त्रीयांसाठी प्रवेश यासारखे मुद्दे उपस्थित केले.

५) 'जमिन मागितल्यामुळे मिळू शकते' हे अविश्वसनीय वाक्य सत्यात उतरवण्यामध्ये ही चळवळ यशस्वी ठरली.

६) हवा, पाणी, आकाश यावरती ज्याप्रमाणे सर्वांचा अधिकार आहे. त्याचप्रमाणे भूमीवर देखील सर्वांचा हक्क आहे. ही नवीन विचारांची मांडणी या चळवळीने केली.

७) जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी सर्वोदय विचार प्रत्यक्षात कृतीमध्ये आणण्यामध्ये विनोबा यशस्वी ठरले. करुणा, लोकशक्ती, लोकसहभाग, ह्रदय परिवर्तन समाजातील दुर्लक्षित वर्गांना मुळ प्रवाहात आणणे, सर्वांना उत्पादनाची साधने यांचे समसमान वाटप करणे, सर्व वर्गाचा उदय साधने या मध्ये भूदान चळवळ यशस्वी ठरली.

**संदर्भग्रंथ :–**


१) भावे विनोबा, 'ग्रामदान' सर्वसेवा संघ, वाराणसी, १९५७

२) भावे विनोबा, सर्वोदय विचार आणि स्वराज्यशास्त्र परंधान प्रकाशन, पवनार, व्दितीय आवृत्ती १९८९

३) भावे विनोबा, साम्यवाद की साम्ययोग, परंधाम प्रकाशन पवनार,१९९०

४) चालेकर पराग, सबै भुमि गोपाल की, भुदान ग्रामदान आंदोलन की कहाणी खंड १,२,३ गुजरात विद्यापीठ, अहमदाबाद ऑगस्ट २०१०

५) राऊत गणेश,भूदान चळवळ, प्रफ्फूलता प्रकाशन, पुणे ११ नोव्हेंबर २०१५

६) धर्माधिकारी दादा,सर्वोदय दर्शन, परंधाम प्रकाशन, पवनार जुलै २००९

७) टिकेकर इंन्दू,सर्वोदय क्रान्तीचे समग्रदर्शन

८) भावे विनोबा,भुदानगंगा (खंड १ ते ९) संपादीत निर्मला देशपांडे, परंधाम प्रकाशन, पवनार, १९५८

९) चोलकर पराग,भूदान ग्रामदान आंदोलन एक नजर आचार्यकुल प्रकाशन, २ ऑक्टोबर १९९७